## परसवाडा येथील पल्लवी राऊत पोलीस विभागात नियुक्ती

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि. २७जून:** परसवाडा (सि.) येथील गरीब सामान्य शेतकरी मजूर म्हणून शेतीत कष्ट करणाऱ्यांची एकुलती एक मुलगी पल्लवी विनायक राऊत हिने जिद्दीने दोन वर्ष खूप परिसश्रम करून महाराष्ट्र पोलीस खात्यात स्थान मिळवाला. तिची नुकतीच जालना पोलीस विभागात नियुक्ती झाली आहे. तिने आपल्या यशाचे शेर्य आई व वडिलांना दिले. पल्लवी गावात आले हे माहित झाल्यावर गावकरी तिचे कौतुक करायला लागले.

याप्रसंगी शाल, श्रीफळ व स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदचे शिक्षण व आरोग्य विभागाचे माजी सभापती रमेश पारधी, तसेच सामाजिक कार्यकर्ता, काँग्रेस चे महासंचिव महेंद्र मेश्राम, गावचे सरपंच सौ. सीमाताई मोरे, पो पा. जितेंद्र मेश्राम, दिलीप लांजेवार, ग्रा. प. सदस्य राऊत ताई, बंडू राऊत व गावकरी या सत्कार प्रसंगी प्रामुख्याने उपस्थित होते.



सिहोरा : पल्लवीच्या सत्कार करताना रमेश पारधी व मान्यवर

# जिल्हयात ७६५ गावांत होणार स्वच्छ सर्वेक्षण

### केंद्रस्तरीय चमू करणार जिल्यातील गावांची तपासणी होणार

**महासागर जिल्हा प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. २७जून:** स्वच्छ भारत मिशन ग्रामीण कार्यक्रमांतर्गत भंडारा जिल्हयातील ७६५ गावांमध्ये 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५' होणार आहे. केंद्रस्तरीय चमुद्वारे गावस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या स्वच्छता सुविधांची स्थिती, वापर या बाबत वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर पहाणी केली जाणार आहे. तसेच थेट कुटूंबियांशी स्वच्छतेबाबत संवाद साधला जाईल. तसेच स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या अप्लिकेशनद्वारे नागरिकांना आपला अभिप्राय नोंदविता येणार आहे. १ जुलै २५ पासून गावांची तपासणी होणार असून जिल्हयातील सर्व गावांनी स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २५ मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) माणिक एस.चव्हाण यांनी केले आहे. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ या वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण अंतर्गत भंडारा जिल्हयातील ७६५ गावांचे केंद्र पुरस्कृत त्रयस्थ यंत्रणेकडून गावांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. यामध्ये गावस्तरावर कुटूंब, गाव व सार्वजनिक ठिकाणांचे सर्वेक्षण केले जाईल. तसेच जिल्हा व तालुकास्तरावर निर्माण करण्यात आलेल्या प्लॅस्टीक कचरा व्यवस्थापन, गोबरधन, मैलागाळ व्यवस्थापनाची पहाणी होईल. गावस्तरावर होणाऱ्या सर्वेक्षणाकरीता विविध घटकांवर १ हजार गुण निश्चित करण्यात आले आहे. हा सर्वेक्षण चार घटकांवर आधारीत आहे. त्या आधारे मुल्यांकण करण्यात येणार आहे.

१ हजार गुणांपैकी सेवास्तर प्रगती (Service level progress) - २४० गुण, थेट निरीक्षण (Direct observation) - ५४० गुण, प्रकल्पांचे थेट निरीक्षण (Direct observation of plants) -१२० गुण आणि नागरिकांचे अभिप्राय




(Citizen feedback) - १०० गुण आकारण्यात आले आहे. पहिल्या सेवास्तर प्रगती या घटकांमध्ये ओडिएफ पूस मॉडेल झालेल्या गावांचे डेस्कटॉप डॉटा पडताळणी होईल. त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, ओडिएफपूस प्रमाणपत्र, आईसी, ग्रामसभेचा ठराव, ग्रामसभेचा ठरावाचा व्हिडीओ बाबत पडताळणी होईल. यावर १०० गुण तर स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण पोर्टलवरील जिल्हा स्वयंअहवालाकरीता १४० गुण आकरण्यात आले आहेत.

दुसरा घटक थेट निरीक्षण (Direct observation) यावर सर्वांत जास्त ५४० गुण आकारण्यात आले आहेत. यामध्ये गावस्तरीय मुल्यांकन केले जाईल, त्यावर २०० गुण, कुटूंबस्तरीय मुल्यांकणावर २४० गुण तर सार्वजनिक ठिकाणांचे मुल्यांकनावर १०० गुण आकारण्यात आले आहे. तसेच स्वच्छ ग्रामीण लोकल रिपोर्ट साईट (SGLR Sites) याकरीता २०० गुण आहेत. यामध्ये कुटूंबस्तरावर स्वच्छता सुविधांची स्थिती, शंभर टक्के गाव हागणदारीमुक्त अल्याबाबत खात्री, हातधुण्याची सुविधा, जैव विघटनशील व नॉनजैवविघटनशिल कचऱ्यांचे सुरक्षित व्यवस्थापन तसेच गावांच्या क्षेत्रीय भेटी दरम्यान सुरक्षित मैला गाळ व्यवस्थापन, सुरक्षित सांडपाण्याचे व्यवस्थापन, गावस्तरावर आईसी व क्षमता बांधणी उपक्रमाची पहाणी होईल तर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या क्षेत्री भेटी दरम्यान कार्यात्मक स्वच्छता सुविधा, दृश्मयान स्वच्छता, कमीत कमी घनकचरा असणाऱ्या जागेची पहाणी, कमीत कमी सांडपाणी असणाऱ्या जागेची पाहणी केली जाईल. तिसरा घटक प्रकल्पांचे थेट निरीक्षण यावर १२० गुण असून यामध्ये प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन युनिटचे निरीक्षण, गोबरधन प्रकल्प/ बायोगॅस प्रकल्पाची पाहणी, मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प/ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे निरीक्षण केले जाईल. या तिन्ही मुद्यावर प्रत्येकी ४० गुण आकारले आहेत.

शेवटचा आणि चौथ्या घटक नागरिकांचे अभिप्राय यावर १०० गुण आकारण्यात आले आहे. यामध्ये प्रत्यक्ष कुटुंबाशी चर्चा करुन तसेच मोबाईल ॲप्लीकेशनच्या माध्यमातून ग्रामस्थांचा स्वच्छ भारत मिशन संदर्भातील प्रतिसाद विचारात घेतला जाणार आहे. या दोन्ही घटकांवर प्रत्येकी ५० गुण आकारले आहेत. या सर्वेक्षणादरम्यान चारही घटकांमध्ये मिळणाऱ्या गुणांकनानंतर जिल्हा, गावांची स्वच्छतेबाबतची स्थिती मांडली जाणार आहे. जिल्हयातील सर्व ग्राम पंचायती, गावांनी स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ मध्ये सहभागी व्हावे, कुटूंबस्तरापासून तर सार्वजनिक ठिकाणांपर्यंत सर्व सोयी सुविधा निर्माण कराव्यात. ग्राम पंचायत पदाधिकारी, शासकिय यंत्रणांनी लोकसहभागातून स्वच्छ सर्वेक्षणाचे नियोजन करून यशस्वी करावा असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) माणिक एस.चव्हाण यांनी केले आहे.

## लोककल्याणकारी राजर्षी शाहू महाराज प्रमुख कर्ते सुधारक- डॉ.जयश्री सातोकर

**भंडारा ,दि. २७जून:** राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण व सामाजिक क्षेत्रात आमुलाग्र क्रांती घडवून आणली तर पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे यांनी वंचितांच्या वेदनेला आपल्या लेखणीतून वाचा फोडणाऱ्या नवोदित साहित्यिक व कलावतांसाठी 'अस्मितादर्श' च्या रूपाने वाङ्मयीन व्यासपीठ उपलब्ध करून दिले. राजर्षी शाहू महाराज खऱ्या अर्थाने रयतेचे पालक होते. म्हणूनच राजे असूनही ते महाराष्ट्रातील प्रमुख कर्ते सुधारक होते असे प्रतिपादन डॉ. जयश्री सातोकर यांनी केले.



बौद्ध साहित्य सांस्कृतिक केंद्र भंडारा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा भंडारा यांच्यावतीने सार्वजनिक वाचनालय भंडारा येथील इंद्रराज सभागृहात राजर्षी शाहू महाराज व पद्मश्री गंगाधर पानतावणे यांच्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल हे होते. विशेष अतिथी म्हणून कार्यवाह डॉ. जयंत आठवले उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या डॉ.जयश्री सातोकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, भारतीय राज्यघटना देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणातून धनंजय दलाल यांनी शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारधारेतूनच पुरोगामी महाराष्ट्र घडल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले.प्रास्ताविक हर्षल मेश्राम यांनी तर आभार प्रा. युवराज खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमाला उद्धव डोरले,प्रा.सुमंत देशपांडे,डॉ. उल्हास फडके,अँड. सुधीर गुप्ते,शेखर गभने,गुणवंत काळबांडे,डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, सौ. वसुधा गुप्ते, ईश्वरलाल काबरा, प्रिती कढव,मंगला भोले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल घनश्याम कानतोडे ,सुधीर खोब्रागडे, दिनेश हरडे,युवराज साठवणे,मारुती वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## रामाजी कापगते विद्यालयात सामाजिक न्याय दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली, दि. २७जून:** दि. २६ जून २०२५ गुरुवारला रामाजी कापगते विद्यालय बोदरा येथ 'सामाजिक न्याय दिन' म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. ए. लंजे, उपाध्यक्षस्थानी श्री. व्ही. जे. कापगते आणि प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एस. डी. समरीत उपस्थित होते. मान्यवरांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेला मालर्पण करुन वंदन केले.

विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. इयत्ता दहावीची विद्यार्थीनी कु. सुरुची अशोक कापगते हिने शाहू महाराजांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारे भाषण दिले. विदयालयातील प्राध्यापक श्री. एल. बी. पारधीकर यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांविषयी सखोल माहिती आपल्या भाषणातून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. आर. ए. लंजे सर यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांच्या कार्याबद्दल महत्वपूर्ण माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एस. ए. कुरेशी यांनी केले आणि श्री. एस. एस. घरडे सर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## एसबीआय शाखेत ७० रक्तदात्यांचे रक्तदान

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. २७जून:** स्थानिक एसबीआय शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. या रक्तदान शिबिरातला प्रचंड प्रतिसाद मिळाला. जवळपास ७० रक्तदात्यांनी रक्तदानाचे पवित्र कार्य पार पाडले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन एसबीआय शाखा प्रबंधक मिथिला साकोरे यांनी केले. त्यांनी स्वतःच प्रथम रक्तदान करून रक्तदान शिबिराला सुरुवात केली. एसबीआय शाखेतील बहुतांश कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून परिसरातील रक्तदात्यांनी रक्तदान शिबिराला सहकार्य केले. लाईफ लाईन ब्लड बँक नागपूर यांच्या सौजन्याने हे रक्तदान शिबिर पार पडले. लाईफ लाईन ब्लड बँक नागपूर यांच्या चमूमध्ये डॉ. अपर्णा सागरे, रुचिता आटे, शंकर तुरकर, स्वाती मेश्राम यांचा सहभाग होता. ग्राहक सेवा केंद्राचे सहकारी चंद्रशेखर उर्फ भोजराम कापगते यांच्यासह शाखा प्रबंधक मिथिला साकोरे, उपप्रबंधक श्रीकांत जणबंधू, युक्ती माने, सह. प्रबंधक माधुरी गजभिये, भूषण सेलोकर, भूषण बोदेले, स्वप्निल हेमने, नरेंद्र अंबुले यांनी परिश्रम घेतले.



## भागरताबाई नत्थुजी नेवारे यांचे निधन

**महासागर प्रतिनिधी**

**महालगांव / सु. , दि. २७ जून:** भागरताबाई नत्थुजी नेवारे रा.वळद ता. साकोली वय ९५ वर्षे यांचे दिनांक २७ जून रोजी पहाटे वृध्दपकाळाने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३.०० वाजता चुलबंद नदी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले १ मुलगी ,नातवंड , सुना, असा आप्त परिवार आहे.



## योगा शेडला संरक्षण भिंत व गेट तयार करा - महिला योग समितीची मागणी

### मुख्याधिकारी नगरपरिषद यांना दिले निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. २७जून:** तालुका क्रीडा संकुल च्या मैदानावर माजी खासदार यांच्या निधीतून नगर परिषदेमार्फत योगा शेड तयार करण्यात आले. परंतु, या शेडला संरक्षण भिंत नसल्यामुळे मोकाट जनावर, कुत्रे, व तरुण मुले मुली दिवसभर बसले असतात. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे चप्पल जोड्याना माती चिकटलेली असते व ती घान ते त्या योगा शेडमध्ये करतात. या योगा शेडमध्ये काही मुलं मोबाईल घेऊन बसले राहतात व भिंतीवर खर्रा खाऊन थुंकतात, सकाळी ३० ते ४० महिला योगा करतात, त्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. महिला योगा शेड ला संरक्षण म्हणून अर्धी भिंत किंवा जाळी व दार लावून देण्याबाबत मा. मुख्याधिकारी नगरपरिषद साकोली यांना निवेदन देण्यात आले . याप्रसंगी महिला योगा ग्रुपमधील सिंधू खोब्रागडे, उषा दत्ता, अविता रहांगडाले, कांता रहांगडाले, शीला कटरे,



योगिता भुजाडे, कांता मारवाडे ,शेवंता भुते, सुशीला साठे, मालती पटले, व महिला योग प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या. याप्रसंगी प्रभाकर सपाटे, किशोर पोगडे, सुरेश बोरकर व इतर योगा प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

## सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश निश्चित मिळत असते- शाहेद कुरेशी

### वॉरियर डिफेन्स अकॅडमी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. २७जून:** योग्य नियोजन, अभ्यासाची योग्य दिशा, आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश नक्की मिळू शकते. तुम्ही वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करत असाल तर त्याबद्दल माहिती, अभ्यास, साहित्य आणि मार्गदर्शनासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. साकोली सारख्या ग्रामीण भागात वॉरियर डिफेन्स अकॅडमीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे शुभारंभ होणे हे एक खूप आनंदाची गोष्ट आहे. असे प्रतिपादन क्रीडा संघटक शाहेद कुरेशी यांनी केले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटना प्रसंगी अध्यक्ष वनिता डोये जि प सदस्य, प्रमुख अतिथी सुनिता करंजेकर उपसभापती पंचायत समिती साकोली प्रमुख मार्गदर्शक क्रीडा संघटक शाहेद कुरैशी, बाळू चव्हाण, पुष्पा कापगते सामाजिक कार्यकर्त्या, सिंधू खोब्रागडे ,रमेश पवार यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन साकोली येथील संताजी तेली सभागृह येथे करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर केंद्राचे प्रमुख लंकेश बडवाईक, सुशांत




भांडेबुचे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून डिफेन्स अकॅडमी विषयी माहिती सांगितली.

उपस्थित सर्व मान्यवरांनी डिफेन्स अकॅडमी ला शुभेच्छा देत साकोली तालुक्यातील विद्यार्थ्यांना या अकॅडमीच्या माध्यमातून विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळावं आणि चांगल्या मोठ्या पदांवर विद्यार्थी विराजमान व्हावं अशा शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार कु. मुस्कान राऊत यांनी मानले.

## अखेर.. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनसची रक्कम वितरीत

### २० टक्के सातबारा पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांचे खात्यावर बोनस जमा

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि. २७जून:** तुमसर-मोहाडी विधानसभा निवडणूकपूर्व तथा सत्तेत आल्यावर वर्तमान सत्ताधाऱ्यांनी विधानसभेचे हिवाळी अधिवेशनात धान उत्पादकांना बोनस देण्याची घोषणा केली होती. पण ६ ते ७ महिन्याचा कालावधी लोटून सुद्धा शेतकऱ्यांच्या बँक खात्यात बोनस जमा केले गेले नसल्यामुळे धान उत्पादकांत संभ्रम निर्माण झाला होता. या बाबद दैनिक वृत्तपत्रांमध्ये बोनस संबंधी वृत्त प्रकाशित होताच महाराष्ट्र शासन खडबडून जागे झाले. तथा जिल्हा पणन अधिकारी भंडारा यांचेकडे आवश्यक ते निधी उपलब्ध केला. पण १७ जुलै २०२५ चे पत्रान्वये शासकीय धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे २० टक्के ७/१२ पडताळणीनंतर बुधवार (ता. २५ जून) दुपारनंतर पणन अधिकाऱ्याने धान उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खात्यात बोनसची रक्कम जमा करणे सुरू केले आहे.

जिल्हयात खरीप हंगामातील मुख्य पीक धान असले तरी धान पिकावर रोग आणि किडींच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात घट येते. तर व्यापाऱ्याकडून पडेल त्या दराने धान खरेदी करून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जाते. धान उत्पादकांबर अन्याय न होता हमीभावाने धान खरेदी केली जावी. या करिता केंद्र शासनाचे वतीने दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडचे वतीने जिल्हा पणन अधिकाऱ्याचे देखरेख व सनियंत्रणात विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, सहकारी भात गिरण्या व सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थांना उपअभिकर्ते नेमून त्यांचेकडून धाण खरेदी केली जाते. उत्पादन कमी व खर्च अधिक त्यामुळे धान उत्पादक शेतक?यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. ही बाब शासनाचे निदर्शनास आल्याने मागील ५ ते ६ वर्षापासून धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस (प्रोत्साहनपर राशी) शासनाकडून दिली जाते. खरीप हंगाम २०२४-२५ विधान सभा निवडणुकीचे तोंडावर असल्याने सत्तासुंदरी मिळावी. या करिता अनेक राजकीय पक्षाच्या नेत्याकडून मतदारांना अनेक आश्वासने देण्यात आली. त्यात तत्कालीन उप-मुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीची सरकार सत्तेत आल्यास धान उत्पादकांना बोनस देण्यात येईल. असे निवडणूकपूर्व आश्वासन दिले होते. राज्यात महायुतीचे बहुमताचे सरकार अस्तित्वात आल्यानंतर विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात धानाला बोनस देण्याचे सत्ताधाऱ्यांकडून जाहीर करण्यात आले.

३१ मार्च पर्यंत बोनस ची रक्कम शेतकऱ्यांचे खात्यात जमा होईल, असे वाटत असताना ५ ते ६ महिन्याचा कालावधी लोटून सुद्धा बोनस ची रक्कम दिली गेली नाही. या बाबद वर्तमानपत्रात बातम्या प्रकाशित होताच शासन खडबडून जागे झाले व जिल्हा पणन अधिकारी यांचेकडे बोनसची रक्कम जमा केली. बोनसची रक्कम पणन अधिकाऱ्याकडे जमा झाल्याचे माहिती होताच महायुतीच्या घटकपक्षातील जिल्हयातील हेवीवेट नेत्यांनी आपल्याच प्रयत्नाने बोनसची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याचे समाजमाध्यमांतून प्रचारित करणे सुरू केले. पण वस्तुस्थिती याउलट आहे. धान खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे २० टक्के ७/१२ तपासणीकरिता उपअभिकर्ता संस्थांना जिल्हा पणन अधिकारी भंडारा यांना १७ जून २०२५ चे पत्रान्वये फर्मान सोडल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस ची रक्कम मिळेल काय ? संभ्रम निर्माण झाला होता. मात्र वृत्तपत्र बातम्या झळकताच शासन खडबडून जागे झाले. जिल्हा पणन अधिकारी भंडारा यांचेकडे आवश्यक ती निधी उपलब्ध करून दिल्यानंतर शासकीय धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या २० टक्के शेतकऱ्यांचे ७/१२ पडताळणी नंतर २५ जून दुपारनंतर बोनस ची रक्कम संबंधित पणन अधिकाऱ्यानी धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे सुरू केले आहे.

## साकोली शहरात मोकाट कुत्रां मुळे घटना घडल्यास नगर प्रशासन जबाबदार राहणार - शहर काँग्रेस कमिटी

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. २७जून:** नगर परिषद क्षेत्रात शेकडोच्या संख्येने मोकाट कुत्रे आहेत. ते प्रत्येक प्रभागात झुंडीने फिरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या मागे धावतात त्या मुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होण्याचे नाकारता येत नाही आहे. त्यामुळे नागरिकात मध्ये भीतीचे वातावरण असून मोकाट कुत्रे आपली दहशत निर्माण करीत आहेत. नुकताच पावसाळा सुरू होत असून शाळा महाविद्यालये सुरू झालेली आहेत. शाळेत जाणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्या मध्ये, पहाटे फिरणा?्या महिला व वयोवृद्धा मध्ये मोकाट कुत्रां मुळे भीतीचे वातावरण शहरात निर्माण झाले आहे. साकोली सेंदुरवाफा शहरात शेकडोंच्या संख्येने मोकाट कुत्रे असून ते झुंडीने फिरत असल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही शुद्ध नागरिकांनी या प्रकाराची माहिती नगर पालिका प्रशासनाला देऊनही प्रशासन मोकाट कुत्रांचा बंदोबस्त करण्यास दिरंगाही करीत असेल तर मोकाट कुत्रां मुळे मोठी घटना घडल्यास नगर पालिका प्रशासन जवाबदार राहील. मोकाट कुत्रांचा होणारा त्रास व होणारी मोठी घटना टाळण्या करिता त्वरीत मोकाट कुत्रांचा बंदोबस्त करण्याची मागणी साकोली शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिलीप मासुरकर यांच्या नेतृत्वात नगर पालिका मुख्यकार्यपालन अधिकारी मंगेश वासेकर यांना निवेदनातून केली आहे. निवेदन देतांना शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिलीप मासुरकर, उपाध्यक्ष दिलीप निनावे, महासचिव लीनप्रकाश राऊत, विजय साखरे, ओंकार कापगते, प्रकाश करंजेकर, दर्यावर डोंगरे, आकाश मेश्राम, कृष्णा हूकरे, चंद्रकांत सोनवाणे, प्रमोद मडावी,सोनू बैरागी, झनकलाल लांजेवार, युवराज कापगते, कुणाल राऊत, मनोहर भिवगडे, पराग कोटांगले, सतीश रंगारी, दिनेश राऊत, अमोल टेंभुर्णे, टॉनिक भेंडारकर, भास्कर पवणकर, गुरुनाथ मसराम, संदीप गुप्ता व इतर शहर काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

